# पर्यावरण विषयक जाहिर सुनावणीचे इतिवृत

**मे. भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड (एल.पी.जी प्रकल्प) यांच्या एम.आय.डी.सी. चिंचोली, तालुका-मोहोळ जिल्हा- सोलापूर येथील प्रस्तावित एलपीजी साठवणूक विस्तारित क्षमता (माऊंटेड स्टोरेज व्हेसल) प्रकल्प संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी बाबतचा इतिवृतांत**

मेसर्स भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड (एल.पी.जी. प्रकल्प), एम.आय.डी.सी. चिंचोली, तालुका-मोहोळ, जिल्हा - सोलापूर या कंपनीच्या प्रस्तावित एलपीजी साठवणूक विस्तारीत क्षमता (माऊंटेड स्टोरेज व्हेसल) प्रकल्प संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी दिनांक १३ जून, २०१७ रोजी सकाळी १०.३० वाजता प्रकल्प स्थळावर आयोजित करण्यात आलेली होती.

सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई-४३/२०१७, व्दारा पत्र क्रं.बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/बी- २२६६, दि. ०३-०६-२०१७ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती गठन करण्यात आलीः-

१) श्री अजित रेळेकर, - अध्यक्ष
अप्पर जिल्हादंडाधिकारी, सोलापूर
(मा. जिल्हादंडाधिकारी,सोलापूर यांचे प्रतिनिधी)

२) श्री ज. शं. साळुंखे, -सदस्य
प्रभारी प्रादेशिक अधिकारी,
मप्रनि मंडळ, पुणे
(मप्रनि मंडळ,मुंबई यांचे प्रतिनिधी)

३) श्री न. सं. अवताडे, - समन्वयक
प्रभारी -उप प्रादेशिक अधिकारी,
मप्रनि मंडळ, सोलापूर

श्री अवताडे , समन्वयक, पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समितीच्या अध्यक्षांचे, प्रकल्प प्रवर्तकांचे प्रतिनिधी व मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत केले. समितीच्या अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी बाबतची प्रस्तावना विषद केली.

समन्वयक यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या वने व पर्यावरण मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या

अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यापुर्वी पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. श्री औताडे यांनी असे सांगितले की उप प्रादेशिक कार्यालय, सोलापूर मेसर्स भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड (एल.पी.जी. प्रकल्प), एम.आय.डी.सी. चिंचोली, तालुका-मोहोळ, जिल्हा - सोलापूर या कंपनीच्या प्रस्तावित एलपीजी विस्तारीत साठवणूक क्षमता (माऊंटेड स्टोरेज व्हेसल) प्रकल्प संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी आयोजित करण्यासाठी अर्ज प्राप्त झाला. सदरहू प्रकल्प घोषित औद्योगिक विभागात कार्यान्वित असून प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ (सुधारित) अन्वये संवर्ग ब मधील ६ (ब) मध्ये मोडत असल्याने त्यासाठी जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

समन्वयक यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे. प्रकल्प प्रवर्तकांनी महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण विभागास पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्याची परवानगी मागितली व सदरहू विभागाने दिनांक १७ जून, २०१६ रोजी त्यास मान्यता देण्यात आली.

वरिल पर्यावरण अधिसुचनेनुसार एक महिना अगोदर स्थानिक वृत्तपत्रात पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी सूचना देणे बंधनकारक आहे. त्याअनुषंगाने उप प्रादेशिक कार्यालय, सोलापूर यांनी स्थानिक वृत्तपत्र लोकमत व दैनिक संचार मध्ये मराठी व इंग्रजी भाषेमध्ये दिनांक १३ मे, २०१७ रोजी लोकहित जाहिर सुनावणी सूचना दिलेली होती. त्यात सामान्य जनतेस उपरोक्त प्रकल्पाविषयी काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास ते लेखी नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले होते. त्याप्रमाणे नियोजित प्रकल्पाविषयीचा पर्यावरण मुल्यांकन आघाताची प्रत मा. जिल्हादंडाधिकारी कार्यालय, सोलापूर, मा. अप्पर जिल्हादंडाधिकारी कार्यालय, सोलापूर, जिल्हा परिषद, सोलापूर, जिल्हा उद्योग केंद्र, सोलापूर, तहसील कार्यालय, मोहोळ, जिल्हा-सोलापूर, ग्रामपंचायत कार्यालये चिंचोली, सावलेश्वर, पाकणी, कोंडी व बिबिदारफळ जिल्हा - सोलापूर, मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई, प्रादेशिक कार्यालय,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे, उप प्रादेशिक कार्यालय,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सोलापूर, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई येथे सामान्य जनतेसाठी उपलब्ध करण्यात आलेले होते. समन्वयक यांनी असे सांगितले की सदरहू प्रकल्पाबाबत एकही लेखी आक्षेप या

कार्यालयास प्राप्त झालेला नाही. समन्वयक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप,हरकती, सूचना असल्यास ती संधि देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात ती देऊ शकतात. श्री अवताडे यांनी पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी सुरु करण्याची विनंती मा. अध्यक्षांना केली.

श्री अजित रेळेकर, अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन प्रकल्प अधिका-यांना व त्यांच्या तांत्रिक सल्लागारांना पर्यावरण विषयक उपाय योजनांची माहिती शासनाच्या व स्थानिक भाषा मराठीतून करण्याची सूचना केली व सर्व जनसमूहाला निर्भयतेने त्यांचे काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास ते नोंदविण्याचे आवाहन केले.

प्रकल्पाच्या तांत्रिक सल्लागारांनी पर्यावरण विषयक उपाय योजनांची माहिती सादरीकरणाव्दारे उपस्थित जनसमूहास दिली. श्री अजित रेळेकर, अध्यक्ष यांनी सर्व जनसमूहाला निर्भयतेने त्यांचे काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास ते नोंदविण्याचे आवाहन केले.

श्री अजिंक्य शितोळे, रा. सोलापूर- यांनी प्रकल्पातील सुरक्षिततेबाबत विचारणा केली.

उत्तर: प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की प्रकल्पात क्वचित अपघाताने एलपीजी गॅस बाहेर पडण्याचे जरी अत्यंत अल्प प्रमाणात शक्यता असली तरीही एखादा अपघाती प्रसंग होऊ शकतो हा विचार करुनच अत्यंत आधुनिक सुरक्षा सयंत्रणा कार्यान्वित करण्यात आलेल्या आहेत. प्रकल्पातील आग विरोधक सयंत्रणा सतत चार तास कार्यान्वित राहिल, एवढी कार्यक्षम आहेत. त्यांनी सांगितले की प्रस्तावित एलपीजी साठवण विस्तार OISD १५० व स्टॅटिक व मोबाईल प्रेशर व्हेसल्स (अनफायरड) नियम, १९८१ प्रमाणे बांधण्यात येईल. प्रकल्पातील साठवण टाक्या बंधिस्त असतील. त्याचप्रमाणे साठवण टाकीजवळील सर्व रस्ते हे नेहमीच सुस्थितीत ठेवण्यात येतील.

श्री धनाजी सुरेश गावडे, रा. सावळेश्वर गाव, यांनी सूचना केली की प्रकल्पात येणारे टॅंकर्स, ट्रक्स हे सोलापूर-हैद्राबाद हायवे वर उभे असतात. त्यामुळे मोठा अपघात होऊ शकतो व वाहतुकीस अडथळा येतो. त्यामुळे ते तिथे उभे करण्यात येऊ नयेत व याबाबत काही अन्य व्यवस्था करण्यात यावी.

उत्तर: प्रकल्प अधिका-यांनी माहिती दिली की प्रकल्प प्रशासनाने अगोदरच वाहनतळ संदर्भात योजना विचारात घेतली असून अतिरिक्त वाहनतळाबाबत धोरण आखले आहे. त्यानुसार प्रकल्प परिसरातच काही वाहने उभी ठेवण्यास जागा उपलब्ध करुन देण्याचा विचार आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाबरोबर वाहनतळासाठी अतिरिक्त

जागेबाबत बोलणी चालू आहेत. प्रकल्पातून लगेचच हायवेवर वाहनांना जावे लागत असल्याने रस्त्याची दिशा बदलण्यात येणार आहे.

श्री असीम सय्यद, रा. सोलापूर यांनी गॅस गळती होऊन आग लागली व गॅस हवेत पसरला तर त्याबाबतच्या सुरक्षायोजनेबाबत विचारणा केली. प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की त्याबाबत अत्यंत आधुनिक सुरक्षा सयंत्रणा कार्यान्वित आहे. गेले तीस वर्षात गॅस गळती होऊन आग लागण्याचा एकही प्रसंग झालेला नाही.

श्री अजित रेळेकर, अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी सांगितले की सामान्य जनतेमध्ये गॅसबद्दल भिती आहे व भोपाळसारखा अपघात या प्रकल्पामुळे होईल अशी भिती वाटते. त्यांचप्रमाणे एलपीजी हा विषारी वायू आहे का व अपघाताने गॅस गळती झाल्यास परिसरातील नागरिकांनी काय उपाययोजना करावी याबाबत जनजागृत्ती वेळोवेळी करावी व उपस्थितांना मार्गदर्श करावे असे मत मांडले. प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की एलपीजी हा विषारी वायू नाही. गॅस गळती अपघाताचे प्रमाण अत्यंत अल्प असले तरी जरी एलपीजी गॅस गळती झाली, तरी हवेपेक्षा जड असल्याने तो प्रकल्पाबाहेर जाणारच नाही व त्यावर त्वरित उपाययोजना करण्यात येईल.

उत्तर:प्रकल्प अधिकारी यांनी पुढे माहिती सांगितली की अशा गॅस गळतीच्या प्रसंगास सामोरे जाण्यासाठी वर्षातून दोन वेळा कृत्रिम कवायत (mock drill) घेण्यात येते. प्रकल्प प्रवर्तकांनी शाळेतील जवळजवळ १,२०० विद्यार्थी व विद्यार्थीनींना प्रशिक्षण दिले असून ते गॅस राजदूत म्हणून गावातील परिसरात कार्य करु शकतात.

श्री अवताडे, समन्वयक, पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी प्रकल्प स्थानावर आपत्कालिन व्यवस्थापन योजना व प्रकल्प परिसराबाहेर आपत्कालिन व्यवस्थापन योजनेतंर्गत प्रकल्प परिसरातील १०.० कि.मी. परिघातील जनतेस प्रशिक्षण देण्याची सूचना केली. प्रकल्प अधिका-यांनी सांगितले की आपत्कालिन व्यवस्थापन योजना तयार असून सामान्य जनतेच्या माहितीसाठी वेळोवेळी राबविण्यात येते. विविध पथांवर (रस्त्यांवर) कृत्रिम कवायत (mock drill), शाळांमध्ये माहितीपत्रके वाटण्यात येतात व त्यामध्ये जिल्हा प्रशासनाचा व विविध संघटनांचा सहभाग असतो.

श्री साळुंखे, सदस्य, यांनी मत मांडले की सादरीकरणात घरगुती व औद्योगिक सांडपाण्याचे प्रमाण व त्यावरील उपाययोजनांची माहिति उतघृत केलेले नाही.

उत्तर: प्रकल्प प्रवर्तकांनी उत्तर दिले की प्रकल्पात घरगुती सांडपाणी सुमारे ८.० किलो लीटर/प्रति दिन उत्पन्न होईल. ते घरगुती सांडपाणी नियंत्रण सयंत्रणेत प्रक्रिया करुन प्रकल्पातच हरित पट्टा विकासासाठी वापरण्यात येईल. घरगुती सांडपाणी नियंत्रण सयंत्रणा ही १५.० किलोलीटर प्रक्रिया करणारी क्षमता असलेला असेल. त्याचप्रमाणे सुमारे

१४.० किलो लिटर औद्योगिक सांडपाणी उत्पन्न होऊन औद्योगिक सांड़पाणी नियंत्रण सयंत्रणेत प्रक्रिया करुन प्रकल्पातील हरित पट्टा विकासासाठी पुनर्वापर करण्यात येईल.

श्री अजित रेळेकर, अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी सदरहू प्रकल्पास सार्वजनिक देयत्ता विमा अधिनियम (Public Liability Insurance Rule) लागू आहे का याबाबत विचारणा केली असता सदरहू कायदा प्रकल्पास लागू असल्याची माहिति प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितली.

अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी उपस्थित स्थानिक जनतेस सदरहू प्रकल्पामुळे जल, हवा व ध्वनि प्रदूषणाचा काही त्रास होतो का अशी विचारणा केली.

श्री बापू भोसले, रा. चिंचोलीकाटी यांनी औद्योगिक सांडपाणी परिसरातील शेतात जाऊन पिकांची नासाडी व शेतजमिन नापिक होऊ नये असे मत व्यक्त केले.

उत्तर: कंपनी अधिका-यांनी सांगितले की फक्त सिलेंडर धुण्यामुळेच औद्योगिक सांडपाणी उत्पन्न होते व त्यावर प्रक्रिया करुन प्रकल्पातील हरित पट्टा विकसित करण्यासाठी वापरण्यात येईल. सांडपाण्याचा एकहू थेंब प्रकल्पाबाहेर जाणार नसल्याची ग्वाही त्यांनी दिली.

श्री सत्तार शेख, रा. चिंचोलीकाटी, यांनी प्रकल्पात एखादा अपघात झाल्यास प्रकल्पात काम करणा-या व्यक्तीवर किती वेळात उपाय करण्यात येतात असे विचारले.

उत्तर: प्रकल्प प्रवर्तकांनी माहिती दिली की प्रकल्प स्थानावर तीन खाटा असलेले आरोग्य केंद्र कार्यान्वित आहे. प्रकल्पात काम करण्या-या सर्वांची वेळोवेळी वैदकीय तपासणी करण्यात येते. त्याचप्रमाणे रुग्णवाहिकेची सेवा ही पुर्णवेळ उपलब्ध असते.

श्री जिलानी शाहजान शेख, रा. सोलापूर, यांनी सदरहू सुनावणी ही फक्त या प्रकल्पासाठीच आहे वा कसे याबाबत विचारणा करुन एम.आय.डी.सी परिसरातील नागरिक वासामुळे त्रस्त आहेत असे सांगितले.

उत्तर: समन्चयक, पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी सांगितले की सदरहू सुनावणी ही फक्त भारत पेट्रोलियम प्रकल्पासाठी असून इतर प्रकल्पामुळे प्रदूषणाची काही तक्रार असल्यास ती लेखी स्वरुपात स्थानिक प्रदूषण नियंत्रण कार्यालयास देण्याची सूचना केली.

श्री गिलानी शेख यांनी प्रकल्पास पूर्ण पाठिंबा असल्याचे सांगितले.

श्री गौतम मोटे, रा. तुळजापूर, यांनी सुट्टीच्या दिवशी अपघात वा आग लागल्यास काय उपाययोजना असल्याचे विचारले.

उत्तर: प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की प्रकल्पात अत्यंत आधुनिक सुरक्षितता सयंत्रणा कार्यान्वित आहे. कुठलीही आग ही इंधन वा ठिगणीमुळे लागू शकते, मात्र प्रकल्पातील सुरक्षितता यंत्रणा ही हवेच्या मदतीने चालते. प्रकल्पातील सर्व कामगार, अधिकारी व सुरक्षादलातील सर्व रक्षक ह्यांना याबाबत विशेष प्रशिक्षण दिलेले आहे. त्याचप्रमाणे संबंधित सर्व कर्मचारी व अधिकारी आधुनिक दळणवळण सांधनांनी जोडलेले आहेत.

श्री दिलीप गजेंद्र टेकाळे, माजी सरपंच, सावळेश्वर गाव, यांनी प्रकल्पास पाठिंबा देताना सोलापूर-हैद्राबाद हायवेवर उभ्या असलेल्या टँकर्स व ट्रक्समुळे अपघाताची भिती वाटते असे मत मांडले. तरी वाहने उभी राहण्यासाठी काही पर्याया व्यवस्था असण्याची आवश्यकता व्यक्त केली. त्याचप्रमाणे प्रकल्प प्रवर्तकांनी हरितपट्टा विकास योजना गावागावत राबवावी अशी सूचना केली. श्री टेकाळे यांनी एलपीजी सिलेंडर वाहून नेणा-या वाहन चालकांना विशेष प्रशिक्षण देण्याची मागणी केली.

उत्तर: प्रकल्प अधिका-यांनी सांगितले की वाहन चालकांना एका वर्षात तीन दिवस प्रशिक्षण बंधनकारक आहे. त्याचप्रमाणे वाहनतळासाठी वेगळी जागा घेण्याचा प्रस्ताव महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास दिलेला असल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे प्रकल्पातून बाहेर जाणारे वाहन हे एकदम हायवेवर जाणार नाही.

अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी प्रकल्प प्रवर्तकांनी सी.एस.आर. फंडांतर्गत जलयुक्त शिवार व वृक्षारोपणाचा कार्यक्रम हाती घेण्याची सूचना केली.

समन्वयक, पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी सांगितले की महाराष्ट्र शासनाने या पावसाळी मोसमात चार कोटी झाडे लावण्याचा संकल्प केलेला असून प्रकल्प प्रवर्तकांनी १० कि.मी. परिघात झाडे लावणेबाबत प्रस्ताव तयार करण्याची सूचना केली.

श्री दिलीप महादेव अलदर, रा. चिंचोली काटी, यांनी समाजोपयोगी कामासाठी प्रकल्प प्रवर्तक राजी होत नाहित असा अनुभव येतो असे मत मांडले.

उत्तर: प्रकल्प अधिका-यांनी माहिती दिली की प्रकल्पाचे मुख्यालय मुंबई येथे असून तेथे याबाबत विशेष विभाग असून सर्व अर्जांची छाननी झाल्यावर निर्णय घेतला जातो.

अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी बैठकीचा समारोप करताना सांगितले की प्रकल्पात अत्यंत आधुनिक सुरक्षितता सयंणा असून ती योग्य प्रकारे कार्यान्वित ठेवतात. त्यांनी मोठ्या संख्येत स्थानिकांनी उपस्थित राहून अतिशय अभ्यासू सूचना, हरकती उपस्थित केल्याबद्दल त्यांचे विशेष आभार मानले. सदरहू सूचना, हरकती पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी इतिवृतान्तात नमुद करुनच सदरहू अहवाल

महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण विभागास पाठविण्यात येतो, त्याप्रमाणे तो सादर करण्यात येईल अशी माहिती अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती यांनी उपस्थितांना दिली.

अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती यांनी उपस्थित स्थानिक रहिवाशी, शासकीय अधिकारी, प्रकल्प अधिकारी यांचे आभार मानून बैठक संपन्न् झाल्याचे जाहिर केले.

(अजित रेळेकर)
अध्यक्ष,
पर्यावरण विषयक जाहीर
लोकसुनावणी समिती तथा
अप्पर जिल्हादंडाधिकारी, सोलापूर

(न. सं. अवताडे)
समन्वयक तथा
प्रभारी उप प्रादेशिक अधिकारी
मप्रनि मंडळ, सोलापूर

(ज. शं. साळुंखे)
सदस्य तथा
प्रभारी प्रादेशिक अधिकारी,
मप्रनि मंडळ, पुणे